प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

## सिडको महामंडळातर्फे भरतीसाठी घेण्यात आल्या विविध संवर्गांतील पदांसाठी परिक्षा प्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न

सिडको महामंडळाने विविध संवर्गाअंतर्गत रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवली होती. त्याअंतर्गत मे. आयबीपीएस यांच्या सहयोगाने दि. १० जून २०२५ रोजी मुंबई, पुणे, नाशिक, रायगड, मिरा भाईंदर येथील विविध परीक्षाकेंद्रांवर आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षांची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे.

**“या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून सिडकोने रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. अनेक अनुभवी, हुशार व आपल्या विषयाचे उत्तम ज्ञान असलेल्या उमेदवारांचे सिडकोसारख्या आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या महामंडळामध्ये काम करण्याचे स्वप्न साकार होणार आहे. परिक्षा दिलेल्या परिक्षार्थींना माझ्या शुभेच्छा.”**

**श्री. विजय सिंघल**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

सिडको महामंडळातील लेखा लिपिक, व्यवस्थापक (प्रणाली), प्रणाली विश्लेषक, सहयोगी नियोजनकार, उपनियोजनकार, कनिष्ठ नियोजनकार व क्षेत्राधिकारी (वास्तुशास्त्रज्ञ) या ६२ रिक्त पदांसाठी अंदाजे ६ हजार अर्जदारांनी अर्ज सादर केले होते. सदर ऑनलाईन परीक्षेसाठीदेखील अर्जदारांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. सर्व परिक्षा केंद्रांवर पोलिसांच्या सहाय्याने परीक्षा शांततेत पार पडली. सिडकोतर्फे सर्व परीक्षा दिलेल्या अर्जदारांना शुभेच्छा.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -